ePaper

## टीएमसीचे नाव-चिन्ह गोठवले; ममतांचे सुप्रीम कोर्टात आव्हान



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

हिंजवडीसह सात गावांचा कचरा कुठे जाणार?

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 20 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दिल्ली विद्यापीठ निवडणुकीत ABVP सह अपक्ष उमेदवाराने रचला इतिहास

# 'अभाविप' चा ऐतिहासिक विजय

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्लीविद्यापीठविद्यार्थी संघटना निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. २० फेऱ्यांच्या मतमोजणीनंतर निकाल घोषित करण्यात आले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने चारपैकी तीन जागांवर मोठा विजय मिळवत गुलाल उधळला आहे. दिल्लीविद्यापीठी विद्यार्थी संघटना अध्यक्ष, सचिव आणि सहसचिव पदी अभाविपचे उमेदवार विजयी झाले आहेत.**









अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे यश डबास यांनी २४,५७६ मते मिळवून अध्यक्षपदावर विजय मिळवत एनएसयूआयचा विजय शंकर मीना (२२,५२३ मते) याचा पराभव केला.

रिया छावडी यांनी २१,६५० मते मिळवून सचिवपदावर विजय मिळवला, तर लक्ष्य राज सिंग यांनी १६,६१५ मतांसह सहसचिवपदावर विजय मिळवला आहे. एनएसयूआयचे माजी सदस्य आणि अपक्ष उमेदवार दीपांशू शोकीन यांनी ३०,६१५ मते मिळवून उपाध्यक्ष पदाच्या निवडणूक विजय मिळवला. अभाविपचे इशू मौर्य १६,९१० मतांसह दुसऱ्या स्थानावर राहिले, तर एनएसयूआयच्या वीर चतरथ यांना ४,३१३ मते मिळाली. निकाल अधिकृतपणे जाहीर होण्यापूर्वी, दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अधिकाऱ्यांनी विजयी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांना विद्यापीठ परिसरात किंवा बाहेर विजय मिरवणूक न काढण्याच्या सूचना दिल्या. नवनिर्वाचित अध्यक्ष यश डबास यांनी त्यांच्या कार्यकाळात केल्या जाणाऱ्या मुद्द्यांवर भाष्य केले. विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे ते म्हणाले. दिल्ली विद्यापीठ निवडणुकीत कथित गैरप्रकार झाल्याच्या एनएसयूआयच्या आरोपांवरही डबास यांनी उत्तर दिले.

त्यांनी सत्य निकेतनच्या घटनेवरही भाष्य केले आणि जीव गमावलेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपला लढा सुरूच ठेवणार असल्याचे सांगितले. पीडितांना न्याय मिळेपर्यंत आपण पायात बूट घालणार नसल्याचेही शोकीन यांनी स्पष्ट केले. रियाने तिच्या आधीच्या निवडणुकीचा अनुभव सांगितला. तिने आधी निवडणूक लढवली होती तेव्हा तिचा पराभव झाला होता. तरीही, तिने प्रयत्न सुरूच ठेवले आणि आता दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी निवडणुकीत सचिवपदी विजय मिळवला आहे.

या निकालामुळे दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थी राजकारणात अभाविप आणि अपक्ष उमेदवारांचे प्रभावी प्रदर्शन पाहायला मिळाले. नव्या पदाधिकाऱ्यांसमोर विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधा, वसतिगृह, सुरक्षा आणि विद्यापीठातील विविध प्रश्न सोडविण्याचे आव्हान असणार आहे.

### जेन झी विद्यार्थ्यांना मूर्ख बनवता येणार नाही - दीपांशू शोकीन

नवनिर्वाचित उपाध्यक्ष दीपांशू शोकीन यांनी 'जेन झी' विद्यार्थ्यांबद्दल सांगितले की, आजची तरुण पिढी आता अधिक जागरूक आहे. ते म्हणाले की, आजच्या जेन झी विद्यार्थ्यांना आता अधिक चांगले समजते आणि त्यांना सहजपणे मूर्ख बनवता येणार नाही. शोकीन म्हणाले की त्यांना विद्यार्थ्यांसाठी प्रामाणिकपणे काम करायचे आहे.

### महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य -सचिव रिया छावडी

नवनिर्वाचित सचिव रिया छावडी यांनी सांगितले की, माझ्या कार्यकाळात महिलांची सुरक्षा ही त्यांची सर्वोच्च प्राथमिकता असेल. तरुण विद्यार्थ्यांनी आशा सोडू नये आणि त्यांच्या ध्येयांसाठी लढत राहायला हवे, असे आवाहन रियाने केले.